पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- १३

स भा वृ त्तां त

दिनांक ५/६/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.५/६/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा.लोंढे नम्रता योगेश | सभापती |
| २) मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ३) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश | |
| ४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव | |
| ५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव | |
| ६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | |
| ७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर | |
| ८) मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर | स्विकृत सदस्य |
| ९) मा.सागर सुखदेव हिंगणे | स्विकृत सदस्य |
| १०) मा.श्रीमती वैशाली प्रशांत खाडये | स्विकृत सदस्य |

याशिवाय मा.प्रदिप मुथा – प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.रविंद्र पवार –कार्यकारी अभियंता पापु, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा.माने- उपअभियंता स्था, वायकर- उपअभियंता ड्रेनेज, मा.बी.बी.कांबळे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.रमेश भोसले-मुख्य आरोग्य निरीक्षक, श्रीमती दमयंती पवार, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) नामकरण करणेबाबत- मा.नम्रता लोंढे,मा. विलास मडीगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) कलम २०५ अन्वये १२ मी.रुंदीचा रस्ता घोषीत करणेबाबत-मा.सारीका बो-हाडे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) जुनी धोकादायक इमारत पाडणेबाबत- मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) जुनी धोकादायक इमारत पाडणेबाबत- मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमकां- ५) अण्णासाहेब मगर स्टेडीयम धोकादायक इमारत पाडणेबाबत- मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) जुनी धोकादायक इमारत पाडणेबाबत- मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

-----

अ) दिनांक २६/४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१० ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २७/४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.११ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----

मा.विलास मडीगेरी–प्रभाग क्रमांक ८ से.क्र.३ येथे "तिरुपती चौक"असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबतचा ठराव यापुर्वी झालेला असल्याने "मा.क प्रभाग समीती सभा ठराव क्रमांक ४ दिनांक २/५/२०१८" हा संपुर्ण ठराव रद्द करणेत येऊन त्या दुरुस्तीसह दिनांक २/५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रीका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत यावा.

मा.सभापती-प्रभाग क्रमांक ८ से.क्र.३ येथे "तिरुपती चौक"असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबतचा यापुर्वी ठराव झालेला असल्याने "मा.क प्रभाग समीती सभा ठराव क्रमांक ४ दिनांक २/५/२०१८" हा संपुर्ण ठराव रद्द करणेत येत असुन त्या दुरुस्तीसह दिनांक २/५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१२) सभावृत्तांत कायम करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – ८ विषय क्रमांक- १

दिनांक-५/६/२०१८

सुचक-मा. नम्रता लोंढे अनुमोदक-मा.विलास मडीगेरी

संदर्भ-मा.नम्रता लोंढे,मा.विलास मडीगेरी यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाच्या से.नं.६ मोशी येथील नवीन आर.टी.ओ.चौकास "हुतात्मा बाबु गेणू चौक" असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – ९ विषय क्रमांक- २

दिनांक- ५/६/२०१८

सुचक-मा.सारीका सस्ते अनुमोदक-मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ-मा.सारीका सस्ते,मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

मौजे बो-हाडेवाडी येथील गट नं.६७,६८,३२,३१,२९,२८,२७ मधुन नवीन १२ मी.रस्ता प्रस्तावीत करणे अत्यावश्यक आहे.

तरी या गट नंबर मधुन पुर्व पश्चिम असा व गट नंबर मधुन दक्षिण उत्तर असा रस्ता कलम २०५ अन्वये घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक- ३

दिनांक- ५/६/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.समीर मासुळकर

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील नेहरुनगर येथील मनपा शाळेच्या आवारातील बालवाडी (पत्र्याची ) इमारत खुप जुनी असुन पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे.सदर ईमारत धोकादायक झाली असुन यामुळे कोणतेही मोठी दुर्घटना होऊ शकते. तरी सदरील धोकादायक इमारत पाडण्यात यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक- ४

दिनांक- ५/६/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.समीर मासुळकर

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील नेहरुनगर येथील मनपा प्राथमिक शाळा क्र.१ ही इमारत खुप जुनी असुन पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे.सदर ईमारत धोकादायक झाली असुन यामुळे कोणतेही मोठी दुर्घटना होऊ शकते. तरी सदरील धोकादायक इमारत पाडण्यात यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक- ५

दिनांक- ५/६/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.समीर मासुळकर

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील नेहरुनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडीयम ही इमारत
( आरसीसी)खुप जुनी असुन पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे.सदर ईमारत धोकादायक झाली असुन यामुळे कोणतेही मोठी दुर्घटना होऊ शकते. तरी सदरील धोकादायक इमारत पाडण्यात यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक- ६

दिनांक- ५/६/२०१८

सुचक-मा.वैशाली घोडेकर अनुमोदक-मा.समीर मासुळकर

संदर्भ-मा.वैशाली घोडेकर,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील खराळवाडी येथील मनपाची व्यायामशाळा जुनी इमारत फक्त पहिला मजला ही इमारत खुप जुनी असुन पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे.सदर ईमारत धोकादायक झाली असुन यामुळे कोणतेही मोठी दुर्घटना होऊ शकते. तरी सदरचा पहिला मजला पाडण्यात यावा.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

सही/
(नम्रता योगेश लोंढे )
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – २६.
क्र-कक्षेका/कावि /३४/२०१८.
दिनांक ०६ /६/२०१८

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग

-------------------